नियमित दिवाणी मुकदमा क्र. ८८/२०१०

निशाण क्र. २१९

प्रतिवादी क्र. २ तर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवदेन करतो की,

माझे नाव – दगडू,     माझे वडीलांचे नाव – सयाप्पा हाके,

वय – ४८ वर्षे,     धंदा – पोलिस निरीक्षक,

निवासस्थान – सायबर पोलिस ठाणे पुणे.

**सरतपासणी प्रतिवादी क्र. २ तर्फे विधीज्ञ श्री. आर.व्ही.रावराणे यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

१. मी देवगड पोलिस ठाणे गु.र.नं. १०/२०११ भा.द.वि. कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१ सह कलम ३४ याचे तपासकाम केले आहे. या कामातील अस्सल कुलमुखत्यारपत्र मी त्या कामातील आरोपी विशाल बाबासाहेब पवार यांचेकडून जप्त केले आहे. सदरचे कुलमुखत्यारपत्र मी दोन पंच सतिश सकपाळ व अमोल वाडेकर या पंचांसमक्ष दि.२४/०६/२०११ रोजी जप्त केले आहे. सदरचा पंचनामा दोषारोपपत्रासोबत न्यायालयात पाठवला आहे. सदर पंचनाम्याची सहीशिक्कयाची प्रत न्यायालयातून काढली आहे. आता मला ती प्रत दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यास नि. क्र. २२० देण्यात येते. तसेच, पंचनाम्यासोबत जप्त केलेले कुलमुखत्यारपत्र तपासकामात जमा केले आहे. वादग्रस्त कुलमुखत्यारपत्र हे दि. ०६/१२/२०१० चे होते. आता मला सदर कुलमुखत्यारपत्राची सही शिक्क्याची प्रत दाखवण्यात आली. ती तीच आहे. सदर कुलमुखत्यारपत्रास ओळखीकरीता नि. क्र. २२१ देण्यात येते. सदर वादग्रस्त

कुलमुखत्यारपत्र जप्त केल्यानंतर मी फिर्यादी व आरोपींच्या सहीचे व डाव्या हाताच्या अंगठयाचे ठश्याचे पंचांसमक्ष नमुने घेतले आणि ते तपासणीकरीता हस्ताक्षर तज्ञांकडे पाठवले. आता मला दि.०२/०७/२०११ रोजीचा फिर्यादी सीमा शंकर तावडे यांच्या सही व डाव्या हाताचा अंगठयाचा नमुने घेतलेला पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पंचनाम्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यास नि. क्र. २२२ देण्यात येते. आता मला दि.१८/०७/२०११ रोजीचा आरोपी विजय आणि भारती यांच्या सही व डाव्या हाताचा अंगठयाचा नमुने घेतलेला पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पंचनाम्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यास नि. क्र. २२३ देण्यात येते. आता मला दि.२०/०७/२०११ रोजीचा आरोपी विशाल बाबासाहेब पवार यांच्या सही व डाव्या हाताचा अंगठयाचा नमुने घेतलेला पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पंचनाम्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यास नि. क्र. २२४ देण्यात येते. आता मला दि.२२/०७/२०११ रोजीचा आरोपी विलास बाबू मिठबावकर यांच्या सही व डाव्या हाताचा अंगठयाचा नमुने घेतलेला पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पंचनाम्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यास नि. क्र. २२५ देण्यात येते. आता मला दि.२३/०७/२०११ रोजीचा आरोपी दत्तात्रय हरी कांबळी, सुबोध दत्तात्रय कांबळी, राहुल विश्वनाथ सहस्त्रबुध्दे, वसंत धोंडू वाडेकर आणि विरेंद्र वासुदेव जाधव यांच्या सही व डाव्या हाताचा अंगठयाचा नमुने घेतलेला पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पंचनाम्यावर

माझी व पंचांची सही आहे. त्यास नि. क्र. २२६ देण्यात येते. त्यानंतर मी दि.१७/०८/२०११ रोजी वर नमूद वादग्रस्त दस्तऐवज व सही व डाव्या हाताच्या अंगठयाचे नमुने माझ्या व एस.पी साहेबांच्या पत्राने मुख्य शासकीय दस्तऐवज परीक्षक, गुन्हा अन्वेषण विभाग महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडे परीक्षण होऊन अभिप्राय मिळणेकरीता पाठवले. आता मला दि.१७/०८/२०११ रोजीचे पोलिस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांचे पत्र दाखवण्यात आले. त्यातील मजकूर बरोबर आहे. तसेच मला आता दि.१७/०८/२०११ रोजीचे मी स्वतः पाठवलेले पत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास नि. क्र. २२७ देण्यात येते. सदरच्या पत्रासोबत मी वादग्रस्त दस्तऐवज, नमुना दस्तऐवज आणि नैसर्गिक दस्तऐवज पोलिस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांचे मार्फत परीक्षणासाठी पाठवले. त्यानंतर परीक्षण विभागाकडून पुर्तता करण्यासाठी वर नमूद दस्तऐवज माझ्याकडे पाठवले होते. त्याची पुर्तता करुन मी ते दस्तऐवज दि. १६/०४/२०१२ रोजी माझ्या पत्रासोबत परत पोलिस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांचे मार्फत परीक्षण विभागाकडे पाठवले आहेत. सदरचा पुर्तता अहवाल दि. १९/०४/२०१२ रोजी पोलिस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांनी पुढे पाठवले. आता मला दि.१६/०४/२०१२ रोजीचे पत्र दाखवण्यात आले. ते माझ्या सहीचे आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास नि. क्र. २२८ देण्यात येते.

२. दि.०६/१२/२०१० रोजी फिर्यादी मुंबई येथे नोकरीस होती का याबाबतचा अहवाल मी प्राप्त करुन घेतला. अहवालानुसार फिर्यादी कॅप जेमिनी विक्रोळी येथे नोकरी करत असल्याचे मला दिसले. त्या अहवालानुसार दि.०६/१२/२०१० रोजी फिर्यादी विक्रोळी मुंबई येथे नोकरीवर हजर होती. सदरचा अहवाल तपासिक अंमलदार म्हणून माझ्या नावे दिला होता. आता मला तो अहवाल दाखवण्यात आला होता. तो तोच आहे. तो अस्सल अहवाल मी दोषारोपपत्रासोबत दाखल केला आहे. सदरचा अहवाल कंपनीचे सिनीयर मॅनेजर यांनी मला दिलेला आहे. सदर अहवालासोबत त्यांनी एक्सेस कंट्रोल मॅकेनिझमचा तपशील, कँडीडेट ॲप्लीकेशन फॉर्म, ऑफर लेटर आणि रजेचा तपशील असे कागदपत्र दिले आहेत. सदरचे कागद मी तपासकामात सामील केले आहेत. तपासकामात मला फिर्यादी दि.०६/१२/२०१० रोजी तहसिलदार कार्यालय, देवगड येथे उपस्थित असल्याची दिसून आले नाही.

सरतपास पूर्ण.

उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.डी.आर.गोरे यांचेमार्फत नाकारला.

उलटतपास प्रतिवादी क्र. ४ ते १२ तर्फे विधीज्ञ श्री.आय.व्ही.ठाकूर यांचे मार्फत नाकारला.

उलटतपास प्रतिवादी क्र. ३ तर्फे मुदतीचा अर्ज नि.क्र. २३० वर दिला. सबब, उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृत

दि.२३/०२/२०२२. दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

Digitally signed by BALKRISHNA RAJARAM PATIL
Date: 2022.02.24 10:36:41 +0530